बुधवार, ८ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १४१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

मालवाहू गाडीचे इंजिन बिघडले; मिनीट्रेनचा खोळंबा/२
अनधिकृत बांधकामाविरोधात तांबडी ग्रामस्थ आक्रमक/५
भारताविरुद्ध कसोटीसाठी द. आफ्रिकेचा संघ जाहीर/६

## गोव्यात काँग्रेसच्या आणखी एका माजी मुख्यमंत्र्याचा राजीनामा



**पणजी :** मागील काही महिन्यांपासून गोव्यात काँग्रेसला गळती लागलेली पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते लुइजिन्हो फेलेरो यांनी राजीनामा देऊन ते तृणमूल काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. त्यानंतर आता गोव्यातील आणखी एका माजी मुख्यमंत्र्यांनी काँग्रेसमधून फारकत घेतली आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते रवी नाईक यांनी मंगळवारी (दि. ७) आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. नाईक हे पोंडा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. त्यांनी गोवा विधानसभा अध्यक्ष राजेश पाटनेकर यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला आहे. दरम्यान, रवी नाईक भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.




(छाया : लक्ष्मण ठाकूर)

# 'दिबां'च्या नावासाठी लढा सुरूच राहणार

## ■ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचा निर्धार

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

भूमिपुत्रांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नेतृत्व व कर्तृत्व श्रेष्ठ होते व राहील. ते देशाला दिशा देणारे नेते होते. 'दिबां'च्या जयंती दिनी १३ जानेवारी रोजी मेळावा घ्यायचा की आंदोलन करायचे याबाबत १ जानेवारी रोजी घोषणा केली जाईल, पण त्यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासाठी पुकारलेला लढा सुरूच राहील, असा निर्धार लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील यांनी मंगळवारी (दि. ७) नवी मुंबईत व्यक्त केला. ते वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या भूमिपुत्र मेळाव्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

दशरथ पाटील पुढे म्हणाले की, कोरोना, नैसर्गिक आपत्ती, सणवार यामुळे विमानतळ नामकरणाच्या लढ्यात खंड पडला असला तरी चळवळ काही थांबलेली नाही. आमचा लढा हा केवळ नामकरण होईपर्यंतचा नसून तो प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न जोवर सुटत नाहीत तोवर कायम पेटलेला राहील.

'दिबां'नी देशाला अनेक कायदे दिले. देशानेही त्यांचा गौरव केला. केंद्र सरकारदेखील आमच्या मागणीसंदर्भात सकारात्मक असून केंद्रीय मंत्र्यांनी विनंती केल्याने आम्ही विमानतळाचे काम बंद पाडले नाही, मात्र राज्य सरकारने योग्य भूमिका घेतली नाही, तर 'दिबां'च्या नावासाठी पुकारलेल्या लढ्यात हौतात्म्य स्वीकारण्यासही तयार असल्याचे दशरथ पाटील यांनी सांगत सरकारला इशारा दिला.

कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, कृती समिती स्थापन झाली व लढ्याला सुरुवात झाली. काही लोकांनी संशय व्यक्त केला की लढा थांबला की काय? मात्र दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला दिल्याशिवाय लढा थांबणार नाही. (पान २ वर..)

> **आपल्या आंदोलनाचा दणका इतका जबरदस्त होता की, दिल्लीकडे जाणारा ठराव राज्य सरकारला थांबवावा लागला, मात्र तो ठराव विखंडित करण्यासाठी काय करता येईल ते ठरवावे लागेल. जर आपले ऐकले नाही, तर सिडकोमध्ये घुसून उत्तर द्यायची तयारी ठेवा.**
>
> **–लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती**

### ...तर भूमिपुत्र त्वेषाने पेटून उठेल –आमदार प्रशांत ठाकूर

नवी मुंबई विमानतळाबाबत आमच्याकडे आमचा अधिकार आहे आणि लोकनेते दि. बा पाटील यांचेच नाव द्यावे ही आमची मागणी आहे. असे असताना शासनाविरोधात बोलल्यावर आवाज दाबण्याचा प्रयत्न केला गेला. भूमिपुत्रांवर ठरवून कारवाई केली गेली. नोटिसा पाठवण्यात आल्या. केसेस दाखल केल्या, मात्र आपला भूमिपुत्र झुकला नाही. उलट आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला तर तो त्वेषाने पेटून उठेल, असा इशारा सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिला.

# ओबीसी जागांवरील निवडणुका स्थगित

## ■ राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**




सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला स्थगिती देण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता राज्य निवडणूक आयोगाने मोठे पाऊल उचलत ओबीसी संवर्गातील जागांवर होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीला स्थगिती दिली आहे. राज्यातील १०६ नगरपंचायतींमध्ये एकूण एक हजार ८०२ जागांसाठी निवडणूक होणार होती. यापैकी ओबीसींच्या ३४४ जागांवरील निवडणुकीला स्थगिती मिळाली आहे. त्याचबरोबर इतर ओबीसी जागांवरील निवडणुकांनाही स्थगिती देण्यात आली आहे.

ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेला अध्यादेश सर्वोच्च न्यायालयात टिकू शकला नाही. या अध्यादेशाला न्यायालयाने स्थगिती दिल्याने राज्य सरकारला मोठा धक्का बसला आहे. यानंतर विरोधी पक्षातील नेते राज्य सरकारला टीकेचे लक्ष्य करीत आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार राज्यातील १०६ नगरपंचायती, भंडारा व गोंदिया जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गतच्या १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २१ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याचबरोबर चार महानगरपालिकांतील चार रिक्तपदांच्या आणि चार हजार ५५४ ग्रामपंचायतींमधील सात हजार १३० रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील २१ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे, मात्र यातील ज्या जागांवर ओबीसी आरक्षण आहे त्या जागांवरील निवडणुकीला स्थगिती देण्यात आली आहे. दरम्यान, इतर प्रवर्गातील जागांवर ठरलेल्या वेळापत्रकानुसारच निवडणुका होणार आहेत.

## अभियांत्रिकी पदवी प्रवेशासाठी मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या फेरींतर्गत प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ट्विटरद्वारे दिली.

याआधी या प्रवेशासाठी ७ डिसेंबरपर्यंत मुदत होती. वाढत्या दबावानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

## आरोग्य विभाग पेपरफुटीप्रकरणी अधिकाऱ्यासह पाच जणांना अटक

**पुणे : प्रतिनिधी**

आरोग्य विभाग पेपरफुटी प्रकरणात पुणे पोलिसांच्या सायबर पोलिसांनी लातूर येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यासह पाच जणांना अटक केली. या प्रकरणातील आरोपींची संख्या आता ११वर पोहचली आहे. विशेषतः अटक केलेल्या आरोपींमध्ये डॉक्टर, शिक्षक, निवृत्त लष्करी जवानांचा समावेश आहे.

प्रशांत व्यंकटराव बडगिरे (रा. अंबेजोगाई, बीड) डॉ. संदीप त्रिंबकराव जोगदंड (अंबेजोगाई, बीड), उद्धव प्रल्हाद नागरगोजे (तितरवणे, बीड), शाम महादू म्हस्के (अंबेजोगाई, बीड), राजेंद्र पांडुरंग सानप (शामनगर, बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

## निवडक

### मणिपूरमध्ये गोदामातून ५०० कोटींचे ड्रग्ज जप्त

**इंफाळ :** मणिपूरच्या तेंगनौपाल जिल्ह्यातील मोरेह येथील एका गोदामातून ५०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. स्थानिक पोलीस आणि आसाम रायफल्सच्या कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी म्यानमारच्या एका नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

### अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात कुंटेंची ईडीकडून चौकशी

**मुंबई :** सध्या अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख हे गृहमंत्री असताना झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांसदर्भात मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार आणि राज्याचे माजी मुख्य सचिव सीताराम कुंटे यांची मंगळवारी (दि. ७) सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) चौकशी करण्यात आली. कुंटे हे ईडी कार्यालयात हजर झाले होते.

युवक काँग्रेसच्या निवडणुकीसाठी महावितरणची यंत्रणा वेठीस

# ऊर्जामंत्री राऊतांनी राजीनामा द्यावा

## भाजयुमो प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्याच्या ऊर्जामंत्र्यांचे चिरंजीव कुणाल हे लढवत असलेल्या प्रदेश युवक काँग्रेसच्या पदाधिकारी निवडणुकीसाठी महावितरणची यंत्रणा वापरली जात असल्याचे सिद्ध झाल्याने ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी मंगळवारी (दि. ७) पत्रकार परिषदेत केली. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेस माजी मंत्री व विद्यमान आमदार आशीष शेलार, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये उपस्थित होते.

या वेळी विक्रांत पाटील यांनी नवी मुंबईत वाशी येथे सोमवार ६ डिसेंबर रोजी महावितरणचे अधिकारी एका बैठकीत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना, तसेच कंत्राटदारांना या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणी कशी करावी याचे मार्गदर्शन करीत असतानाची ध्वनिचित्रफीत सादर केली. या कामात मदत करण्यासाठी 'वरून दबाव' आहे, तसेच या कामात मदत केल्यास कंत्राटदारांना योग्य बक्षीस मिळेल, मदत न केल्यास त्याचेही 'फळ' मिळेल अशा भाषेत महावितरणचे अधिकारी या बैठकीत बोलत असल्याचे दिसून येते. या बैठकीच्या ठिकाणी विक्रांत पाटील, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, प्रशांत कदम आदी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला व संबंधित अधिकाऱ्यांना जाबही विचारला. या वेळी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना एका अधिकाऱ्याची महावितरणची डायरी व्यासपीठावर मिळाली. (पान २ वर..)

# विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही

## अरुणशेठ भगत यांचे प्रतिपादन; रस्ते कामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचा विकास निधी, तसेच मूलभूत सुविधा विकास योजनेंतर्गत (२५/१५) पनवेल तालुक्यातील विविध रस्ते कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन मंगळवारी (दि. ७) भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अरुणशेठ भगत यांनी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास होत असून गावाचा विकास करण्यासाठी भाजपशिवाय पर्याय उरलेला नाही, असे प्रतिपादन केले.


पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे विकासाची अनेक कामे सुरू आहेत. त्या अंतर्गत आमदार विकास निधीतून आठ लाख रुपये खर्चाच्या शिवणसई थांबा ते दुर्गामाता मंदिर आणि १० लाख रुपये खर्चाच्या चिंचवली ते भानघर या रस्त्यांचे, तर मूलभूत सुविधा विकास योजनेंतर्गत (२५/१५) वाकडी ते दुंदरे या २० लाख रुपये खर्चाच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे मोर्बे येथील एकनाथ नावडेकर यांचे घर ते मराठी शाळेपर्यंत आमदार निधीतून १६ लाख रुपये खर्च करून रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटनही अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. (पान २ वर..)

## पेणमध्ये २१ लाखांचा गुटखा पकडला; चालक ताब्यात

**पेण : प्रतिनिधी**

अवैधरीत्या गुटखा वाहतूक करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी टेम्पो व मालासह मुंबई-गोवा महामार्गावर खारपाडा गावच्या हद्दीत पकडले. या कारवाईत २१ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा घेऊन जुन्नरमधील काटेड येथील चालक विपुल विलास चिपळ हा विक्री करण्यासाठी चालला होता. त्याचा टेम्पो ६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४च्या सुमारास खारपाडा गावाजवळ आला असता पोलिसांनी पकडले. त्याच्याकडे बनावट पावती आढळली. या कारवाईत पोलिसांनी २१ लाख ९ हजार ९८० रुपये किमतीचा माल हस्तगत केला असून आरोपीविरोधात दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी तपास सुरू आहे.


## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

### पनवेल महानगरपालिका हद्दीत
### बुधवार, दि. ८ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
# कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
■ २. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
■ ३. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
■ ६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

■ ७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
■ ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
■ ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
■ १०. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
■ ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
■ १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
■ १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
■ १४ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
■ २. काळण समाज हॉल, पनवेल ■ ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

■ वळवली रा.जि.प. शाळा
■ रोहिंजण रा.जि.प. शाळा
■ मुर्बी रा.जि.प. शाळा
■ कोयनावेळे रा.जि.प. शाळा
■ पाले खुर्द रा.जि.प. शाळा
■ पेंधर रा.जि.प. शाळा
■ तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
■ कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
■ आसुडगाव रा.जि.प. शाळा
■ जुई रा.जि.प. शाळा

# पेणमध्ये अद्ययावत मच्छीमार्केट उभारणार -आमदार रविशेठ पाटील

(छाया : अनिस मनियार)



**पेण : प्रतिनिधी**

कोळी समाज अतिशय कष्टाळू असून येथील महिला सकाळपासून मच्छीविक्री करीत असतात. या कष्टकरी समाजासाठी भविष्यात पेणमध्ये नवीन अद्यावत मच्छीमार्केट उभारणार असल्याची ग्वाही आमदार रविशेठ पाटील यांनी दिली.

पेण कोळीवाडा येथील मच्छीमार्केटच्या कामाचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. नवीन मच्छीमार्केटसाठी जागा, सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम आगामी काळात नगराध्यक्षा नक्कीच करतील, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

पेण कोळीवाडा येथे सध्या शेडच्या स्वरूपात बांधकाम करण्यात येणार असून, त्यामुळे मच्छीविक्रेत्या भगिंनीना रस्त्यावर न बसता शेडमध्ये बसून मच्छीविक्री येईल. भविष्यात कोळी बांधवासाठी सुसज्ज मच्छीमार्केट कशाप्रकारे बांधता येईल, यासाठी आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार असल्याचे नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी या वेळी सांगितले.

पेण नगर परिषदेचे गटनेते अनिरुद्ध पाटील, सभापती दर्शन बाफणा, नगरसेविका शेहनाज मुजावर, देवता साकोस्कर, अश्विनी शहा, नगरसेवक अजय क्षीरसागर यांच्यासह कोळीवाडा पंचकमिटी अध्यक्ष व कोळी बांधव उपस्थित होते. विजय आवास्कर यांनी आभार मानले.

# मालवाहू गाडीचे इंजिन बिघडले

## मिनीट्रेनचा सहा तास खोळंबा

(छाया : संतोष पेरणे)





**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वे प्रशासनाने मिनीट्रेनची नेरळ-माथेरान-नेरळ अशी प्रवासी वाहतूक सुरू करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी नॅरोगेज ट्रॅकची दुरुस्ती सुरू आहे, मात्र सोमवारी (दि. ६) या कामासाठी आवश्यक असलेले साहित्य घेऊन गेलेल्या मालवाहू ट्रेनच्या इंजिनात बिघाड झाला आणि ही ट्रेन नॅरोगेजवर तब्बल सहा तास थांबून राहिली.

नॅरोगेज ट्रॅक नादुरुस्त असल्याने मिनीट्रेनची माथेरान-नेरळ ही प्रवासी सेवा गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहे, मात्र पर्यटकांची मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने माथेरान ते अमन लॉज अशी वाहतूक सुरू केली आहे. पर्यटकांना नेहमीच नेरळ-माथेरान या मिनीट्रेनचे कायम आकर्षण राहिले आहे. त्यात मिनीट्रेनला जागतिक वारसा मिळविण्याच्या नामांकनासाठी रेल्वे बोर्ड धडपडत आहे. हे लक्षात घेऊन नेरळ-माथेरान नॅरोगेज मार्गावर मोठ्या प्रमाणात दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

गेल्या १५ दिवसांपासून नेरळ येथून दररोज मालवाहू मिनीट्रेनमधून दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे साहित्य नेले जात आहे. नेरळ येथून दुरुस्तीचे साहित्य घेऊन निघालेली मिनीट्रेन सोमवारी सायंकाळी ४ वाजता परतीचा प्रवास करताना बंद पडली. या मालवाहू ट्रेनच्या इंजिन एनडीएम ४०१ मध्ये बिघाड झाला होता. या इंजिनाची दुरुस्ती करण्यासाठी नेरळ कार्यशाळेतून तंत्रज्ञ पाठवण्यात आले. मात्र इंजिन दुरुस्त होण्यास तब्बल सहा तास लागले. ४ वाजता बंद पडलेल्या मालवाहू मिनीट्रेनने रात्री १० वाजता आपला परतीचा प्रवास सुरू केला आणि रात्री सव्वाआकराच्या सुमारास ही मिनीट्रेन नेरळ रेल्वे स्थानकात पोहचली.

# सीकेटी महाविद्यालयात सकाळ-यिन फोरमची स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सकाळ वृत्तपत्र समूहाच्या यंग ईन्स्पीरेटर्स नेटवर्कच्या (YIN) नेतृत्व विकास प्रकल्पांतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्याकरिता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर कॉलेज (स्वायत्त) मध्ये सीकेटी यिन फोरमच्या अध्यक्षपदाची निवडणूक झाली. यामध्ये विद्यार्थिनी स्नेहल नरवडे बहुमताने निवडून आली. या निवडणुकीत नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी मतदाराची भूमिका बजावली.

निवडणुकांचे निकाल रविवारी (दि. ५) जाहीर करण्यात आले. मंगळवारी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष स्नेहल नरवडे, उपाध्यक्ष नेहा कुलकर्णी, सचिव रचिता मुंबईकर, कार्यकारी मंडळ सदस्य नील जाधव व पूर्णिमा गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी सकाळ-यिनचे प्रादेशिक अधिकारी गणेश गोलप, सीकेटी-यिन फोरमचे समन्वयक प्रा. आकाश पाटील, सहसमन्वयिका प्रा. अपूर्वा ढगे, सांस्कृतिक समन्वयक प्रा. गणेश जगताप व सीकेटी-यिन सदस्य उपस्थित होते. सीकेटी-यिन फोरमच्या नवनिर्वाचित सदस्यांना जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थ्येचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : भाजपचे मोर्बे येथील रघुनाथ नावडेकर यांच्या नवीन गाडीचे पूजन भाजप तालुकाध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, ओबीसी नेते एकनाथ देशेकर, पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिल **मे. आर.के. एंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) श्री. रणजीत हरीश्चंद्र जोशी, २) श्री. रवींद्र गणपत जोशी, ३) श्री. दिलीप काशिनाथ म्हात्रे व ४) सौ. शीतल किशोर म्हात्रे** ऑफीस शॉप नं. ४, साई दर्शन बिल्डींग, सेक्टर १९, कामोठे, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांनी खालील वर्णनाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात मिळालेले भूखंड विकसनाकरिता घेतलेले आहेत. **सदरहू भूखंडापैकी ५० टक्के भूखंडाचे हस्तांतरण करणेचे आहेत.** सदरहू भूखंड हे **कै. अरविंद बाळाराम भोईर यांचे वारस १.१) श्रीमती. अंजना बाळाराम भोईर, १.२) श्रीमती अपर्णा अरविंद भोईर, १.३) कुमारी किजर अरविंद भोईर, १.४) कुमारी काव्या अरविंद भोईर, २) श्री. परशुराम जोमा भोईर, ३) श्री. रुपेश परशुराम भोईर, ४) श्री. शैलेश परशुराम भोईर, सर्व रा. मु. कोल्ही, पोस्ट पारगांव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६** यांच्या मालकीचे आहेत. सदरहू संपादीत जमीन मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे,

**संपादित जमीन मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका-पनवेल, जि. परिषद रायगड, पंचायत समिती पनवेल व मे. दुय्यम निबंधक साहेब, पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**संपादित जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | तालुका व जिल्हा | ॲवार्ड क्रमांक | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | संपादित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| कोल्ही | पनवेल, रायगड | KOL-ICIG-47 | Un-numbered land in Gaothan along with structure | १४४.३८ |

**वरील संपादित मिळकतीच्या मोबदल्यापोटी मिळणाऱ्या भूखंडाचे वर्णन**

| भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्रमांक | भूखंड क्रमांक | एफ.एस.आय. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| पुष्पक वडघर | R३ | १४८ | १.५ | ४६० |

वरील संपादित जमीन मिळकतीवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**तारीख : ०७/१२/२०२१**

**सही/-**
**ॲड. आशा अरुणकुमार भगत**
शॉप ३, प्लॉट ५२, सेक्टर १०,
कामोठे, पनवेल, जि. रायगड.
मो.नं. ८१०८३५५०००


**अलिबाग : प्रतिनिधी**

# राजिपची 'शिवतीर्थ' धोकादायक

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाची इमारत 'शिवतीर्थ' धोकादायक असल्याचा अहवाल लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे स्ट्रक्चरल अभियंता डॉ. सचिन पोरे यांनी दिला आहे. त्यामुळे ही इमारत आता पाडावी लागणार आहे. 'शिवतीर्थ' इमारत १९८२ साली बांधून पूर्ण झाली. गेली ४२ वर्षे या इमारतीतून जिल्ह्याचे कामकाज सुरू आहे.

या इमारतीने अनेक सत्तांतरे पाहिली. अधिकारी, पदाधिकारी पाहिले. या प्रदीर्घ कालावधीत इमारतीच्या अंतर्गत दालनात वारंवार बदल झाले. आतापर्यंत नूतनीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत. या पैशातून नवीन इमारत उभी राहिली असती. इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतरिम अहवाल ११ नोव्हेंबर २०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांना प्राप्त झाला आहे. या अहवालात जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत जुनी झाली असून शासकीय काम करण्यास धोकादायक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या जि. प.च्या सर्वसाधारण सभेत सीईओ डॉ. पाटील यांनी 'शिवतीर्थ' पाडावी लागणार असल्याची माहिती दिली होती.

पान १ वरून

## 'दिबां'च्या नावासाठी लढा सुरूच राहणार

सिडकोने भूमिपुत्रांची काय अवस्था केली आहे हे संपूर्ण महाराष्ट्र बघतो आहे. आपण नागवले गेलो आहोत. जमिनीसोबत आपल्यावरून बुलडोझर चालले आहेत. सिडकोने साडेबारा टक्के व साडेबावीस टक्के जाहीर केले, मात्र अनेकांना अडचणीच्या ठिकाणी भूखंड दिल्याने ते बदलून घेण्यासाठी प्रकल्पग्रस्तांना फेऱ्या माराव्या लागत आहेत. ५० टक्के लोकांनादेखील नुकसानभरपाई मिळालेली नाही, याकडे कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष वेधले.

कृती समितीचे सरचिटणीस भूषण पाटील म्हणाले की, शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार सिडकोने केलेला ठराव विखंडित करण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करू. भिवंडीचे भारद्वाज चौधरी यांनी, जर तुमचा आमच्या बापाच्या नावाला विरोध असेल तर बाळासाहेबांच्या नावाला आमचा विरोध राहणार, असे स्पष्ट केले. दशरथ भगत म्हणाले की, दि. बा. पाटील ही तमाम भूमिपुत्रांची ओळख आहे. त्यामुळे या नावासाठी कोणताही लढा उभारण्यास तयार आहोत. डॉ. राजेश पाटील यांनी ग्रामस्थ कृती समितीकडे आशेने पाहत असून प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.

खजिनदार जे. डी. तांडेल, गुलाब वझे, मनोहर तांडेल यांचीही भाषणे झाली. या वेळी व्यासपीठावर कार्याध्यक्ष माजी खासदार संजीव नाईक, नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार, कृती समितीचे मनोहर पाटील, माजी नगरसेवक रामचंद्र घरत, शैलेश घाग आदींसह पाचही जिल्ह्यांतून आलेले भूमिपुत्र उपस्थित होते.

## ऊर्जामंत्री राऊतांनी राजीनामा द्यावा

या डायरीत ऊर्जामंत्र्यांच्या चिरंजीवांना निवडणुकीत कसे साह्य करावयाचे आहे याची टिपणे आढळून आली आहेत. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आल्याचे पाटील यांनी नमूद केले.

पाटील यांनी सांगितले की, वाशी येथील घटनेतून महावितरणची यंत्रणा ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी आपल्या चिरंजीवांच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या दावणीला बांधली असल्याचे सिद्ध झाले आहे. या प्रकाराची जबाबदारी स्वीकारून नितीन राऊत यांनी ऊर्जामंत्रीपदाचा तातडीने राजीनामा द्यावा; अन्यथा भारतीय जनता युवा मोर्चा राज्यभर आंदोलन करेल, असा इशाराही पाटील यांनी या वेळी दिला.

## विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही

ठिकठिकाणी झालेल्या या कार्यक्रमांना भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, सरपंच अनुराधा विष्णू वाघमारे, उपसरपंच मंगला गणेश उसाटकर, ग्रामपंचायत सदस्य रमेश नावडेकर, एकनाथ नाईक, माजी सरपंच नरेश पाटील, तसेच प्रकाश खैरे, नामदेव जमदाडे, शिवाजी दुर्गे, रमेश पाटील, मयूर कदम, दिनेश फडके, बाळाराम उसाटकर, रामदास फडके, रामदास म्हात्रे, रवींद्र पाटील, नारायण भगत, जयवंत खोपकर, जनार्दन भगत, हरिश्चंद्र नावडेकर, प्रमोद भगत, शांताराम चौधरी, किशोर पाटील, नारायण चौधरी, शत्रुघ्न उसाटकर, उमेश वारदे, गणेश म्हात्रे, भगवान म्हात्रे, धनाजी शिंदे, पिंटू म्हात्रे, विठ्ठल पाटील, भीमा गोसावी, बाळाराम पालांडे, शंकर पवार, विष्णू चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. या विकासकामांबद्दल ग्रामस्थांनी आमदार प्रशांत ठाकूर व भाजपला धन्यवाद दिले आहेत.








## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी भोगवटादार **(१) श्री. किरण भगवान म्हात्रे, (२) श्री. संतोष भगवान म्हात्रे, (३) सौ. सुरेखा जयेंद्र ठाकूर, (४) सौ. हर्षदा हरेश म्हात्रे, (५) सौ. संगिता किरण घरत, (६) सौ. दिपाली दिपक माळी, (७) श्री. गिरीष भगवान म्हात्रे आणि (८) सौ. शकुंतला भास्कर म्हात्रे** यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील **मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** येथील जमीन मिळकती ह्या कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमीन मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

| गावाचे नाव | गट क्र.व उपविभाग क्र. | लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. प्रति. | पोटखराबा हे.आर. प्रति. | एकूण क्षेत्र हे.आर.प्रति. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड | २९४/७/९/११/ब | ०-१२-१० | ०-०१-०० | ०-१३-१० |
| | ३१०/४ | ०-०१-३० | - | ०-०१-३० |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमीन मिळकतीसंदर्भात साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित भोगवटादार यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापूर्वी सदरच्या मिळकती ह्या निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. त्याकरिता जर वरील नमूद केलेल्या मिळकतींवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या** आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमीन मिळकती ह्या सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असतील आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशील हे सदरच्या जमीन मिळकती ह्या कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**
(वकील)
पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर, प्लॉट नं. २१,
सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई,
ता. आणि जि. ठाणे. फोन नं. ९६१९५०५९५८



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल **मे. विला सिटी बिल्डर्स एल एल पी. तर्फे अधिकृत भागीदार श्री. करण सुधीर भट्ट आणि मे. रितुराज डेव्हलपर्स (भागीदारी संस्था) वतीने अधिकृत भागीदार श्री. मनिष विठ्ठलभाई हिराणी** यांनी भूखंडधारक **(१) श्री. समाधान गणेश साखरे हे मयत कै. शकुंतला गणेश साखरे** यांचे वारस व उत्तराधिकारी, **(२) सौ. हेमलता वसंत सोनटक्के, (३) सौ. सुनिता अशोक पातकर, (४) श्री. राकेश गजानन जगे, आणि (५) सौ. निता रोशन पातकर,** यांच्याकडून त्यांच्या लाभांत वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे सिडकोची पूर्व परवानगी घेऊन हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे-

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भूखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड | १२४ | ४८ | ९००.२७ चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भूखंडाचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर सदरहू भूखंडासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे हस्तांतरण करण्यापूर्वी, सदर भूखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे. जर वरील नमूद केलेल्या भूखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांचे** आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे. आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचा भूखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशील हे सदरहू भूखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रक्रिया आणि व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**
(वकील)
पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर, प्लॉट नं. २१,
सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई,
ता. आणि जि. ठाणे. फोन नं. ९६१९५०५९५८

## निवडक

### जमिनीच्या वादातून एकाची हत्या

**पनवेल :** जमिनीच्या वादातून एका ५० वर्षीय इसमाची



त्याच्याच नातेवाईकांनी हत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील घोट गावाच्या हद्दीत घडली. निवृत्ती बाबू पाटील असे मृत इसमाचे नाव असून या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोट येथील सुनंदा कोळेकर व त्यांचा मयत भाऊ निवृत्ती बाबू पाटील व त्याचा मुलगा निरंजन असे गावातील पिंपळपाडा येथील चाळीच्या मागील बाजूस बोरवेलच्या पाईपलाईनचे काम करत होते. या वेळी मोठा भाऊ बाळाराम बाबू पाटील व त्यांची दोन मुले यांनी त्या ठिकाणी येऊन बोरवेलचे काम करण्यास विरोध केला. त्यानंतर झालेल्या वादातून निवृत्ती पाटील यांच्यावर वार करून हत्या करण्यात आली. या प्रकरणी बाळाराम बाबू पाटील, नितीन बाळाराम पाटील, मनोज बाळाराम पाटील यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भंगार सामान चोरणारा अटकेत

**पनवेल :** टाटा टेम्पोमध्ये भरलेले भंगार सामान चोरी केल्याप्रकरणी एका आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. प्रेमचंद डांगी यांचे पनवेलमधील रिद्धी सिद्धी बिल्डिंग शॉप नं ६ व ७ या ठिकाणी दुकान असून त्यांच्या दुकानासमोर त्यांनी टाटा टेम्पो उभा केला होता. त्यामध्ये विविध प्रकारचे लोखंडी पाईप, एलबो, चारचाकी वाहनांची क्लचप्लेट असे हजारो रुपयांचे सामान ठेवले होते. त्या मालाची चोरी आरोपी शादाब मेमन (वय २३) याने केली. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुनील गिरी, दीपक शेळके आदींच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे.

### दागिन्यांची बॅग खेचून इसम पसार

**पनवेल :** गाडीतून सामान बाहेर काढत असताना एका बॅगेत ठेवलेले जवळपास तीन लाख ९२ हजारांचे सोन्याचांदीचे दागिने खेचून एक इसम पसार झाल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे. होनाराम ओगडराम चौधरी (वय ४३, रा. कल्याण) हे त्यांच्या पत्नी व मुलीसह एका खाजगी वाहनाने खारघर येथून कल्याणला जात होते. तळोजा एमआयडीसी देना बँकेपुढील चौकात त्यांची गाडी आली असता त्यांच्या पत्नीला उलटीसारखे होऊ लागले. यावेळी त्या गाडीत असलेल्या दुसऱ्या इसमाने तुम्हाला उलटी होत असेल तर येथून दुसरी रिक्षा करून जा, असे सांगितले. या वेळी होनाराम चौधरी यांनी पाठीमागील सीटखाली असलेल्या त्यांच्या चार बॅगा खाली घेतल्या. सोन्याचांदीचे दागिने असलेली सुटकेस खाली घेत असताना गाडीच्या पाठीमागील इसमाने ती बॅग त्यांच्या हातातून जबरदस्तीने हिसकावून घेऊन तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शासनाचे भूखंड आरक्षणावर निर्बंध

## ■ पालिकेच्या विकास आराखड्यावर फिरवले पाणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अडीच वर्षांपूर्वी पालिका सभागृहाने मंजूर केलेल्या विकास आराखड्यात टाकण्यात आलेल्या भूखंडावरील आरक्षणाला नगरविकास विभागाने निर्बंध घातले आहेत. तसेच ५०० मीटरवरील क्षेत्राफळाचे भूखंड विकण्याची सिडकोला मुभा दिली आहे. त्यामुळे पालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यावर शासनाने पाणी फिरवले आहे. पालिकेला भविष्यात लागणाऱ्या समाजोपयोगी कामासाठी मोठे भूखंड यामुळे शिल्लक राहणार नाहीत.



गेली ३० वर्षे नवी मुंबई पालिकेचा स्वतंत्र विकास आराखडा नाही. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने विकास आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. आतापर्यंत पालिका सिडकोच्या विकास आराखड्यावर शहराचा विकास व देखभाल करीत आहे. न्यायालयाने आदेश दिल्याने अडीच वर्षांपूर्वी माजी पालिका आयुक्त एम. रामस्वामी यांनी नगररचना विभागातील काही अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून हा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. त्याला फेब्रुवारी २०२०च्या सर्वसाधारण सभेत सर्व लोकप्रतिनिधींची संमती घेण्यात आली आहे. त्यानंतर तो शासन मंजुरीसाठी पाठविण्यात आला, मात्र त्याला नगरविकास विभागाने प्रसिद्ध करण्यास परवानगी देण्याऐवजी लालफितीत अडगळीत ठेवला आहे. याचा फायदा उचलून सिडको नवी मुंबई क्षेत्रातील मोक्याचे मोठे भूखंड विकत आहे. सिडकोच्या या कृतीला नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रोत्साहन दिले आहे.

मागील महिन्यात नगरविकास विभागाने एक आदेश देत सिडकोला भूखंड विकण्याची मुभा दिली. पालिका केवळ ५०० मीटरच्या भूखंडावर आरक्षण ठेवू शकणार आहे. त्यामुळे पालिकेला आरोग्य, शिक्षण सुविधांसाठी मोठे भूखंड उपलब्ध होणार नाहीत. नगरविकास विभागाच्या या निर्णयाविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून १५ डिसेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. या निर्बंधांमुळे शहराचे मात्र मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे पालिकेला आरोग्य, शिक्षण सुविधांसाठी मोठे भूखंड उपलब्ध होणार नाहीत.

नवी मुंबई हे सुनियोजित शहर असून दिवसेंदिवस या शहराची लोकसंख्या आणि व्याप्ती वाढत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू झाले असून लवकरच विमानतळ सुरू होईल. त्यानंतर मात्र शहराला आणखी महत्त्व प्राप्त होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर या ठिकाणी मोठमोठी महाविद्यालये आणि आरोग्य सुविधांची गरज पडणार आहे. त्या वेळी नवी मुंबई महानगरपालिकेला या सुविधा उभारण्यासाठी भूखंडांची कमतरता भासू शकते.

## पनवेलमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग आणि विशेषतः राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत शनिवारी (दि. ४) सकाळी ११ वाजता गरूड झेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले.



प्रत्येक महिन्याच्या दर शनिवारी व रविवारी हे मार्गदर्शन केंद्र सुरू असणार आहे. या मार्गदर्शन केंद्रामध्ये शासकीय सेवेत उत्कृष्ट काम केलेल्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण येथील भाऊसाहेब नेने कॉलेज हॉल येथे हे केंद्र सुरू होणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २ जानेवारी २०२२ रोजी राज्यसेवा पूर्वपरीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या मार्गदर्शन केंद्राचा लाभ मिळणार आहे, तसेच कोविड १९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांना पेण येथील केंद्रावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांसाठी ते राहत असणाऱ्या तालुक्यातील तहसीलमध्ये दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून थेट प्रक्षेपणाद्वारे या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याची सुविधा जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी तहसीलदार विजय तळेकर यांच्या सूचनेनुसार या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शनिवारी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले. याशिवाय या स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी जिल्ह्यातून अधिक प्रतिसाद मिळाल्यास जिल्ह्यात अन्य तालुक्यांमध्येदेखील अशा प्रकारचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येईल, असा मानस जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची आणि विशेषतः राज्यसेवा पूर्वपरीक्षेची तयारी करणाऱ्या पनवेल तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या केंद्रातील सुविधांचा लाभ घेण्यासाठी तहसील कार्यालयात अर्ज करून या मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांच्या वतीने तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.



**उरण : वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी तालुका पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. याबद्दल त्यांची कामगार नेते जितेंद्र घरत यांच्यासह कार्यकर्त्यांनी सदिच्छा भेट घेऊन अभिनंदन केले.**

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवाला आदरांजली

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.



शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफवर्कर अरुण घाग, विद्यालयाचे उपप्राचार्य पी. पी. मोरे, पर्यवेक्षक आर. एस. साळुंखे, रयतसेवक संघाचे समन्वयक एन. एच. शेख व सर्वसेवक वर्ग उपस्थित होते. तसेच यशवंत घरत, अशोक पाटील, बाबुराव मढवी, सुभाष घरत, संजय ठाकूर आदी उपस्थित होते.

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे सोनवारी (दि. ६) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.



विद्यालयाचे प्राचार्य एम. एच. पाटील, उपमुख्याध्यापक व्ही. एल. नरवडे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे, आर. एन. पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील, दर्शना माळी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी ज्युनिअर कॉलेज आणि माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. इयत्ता नववीच्या वर्गाने हा कार्यक्रम साजरा केला.

प्रतिमापूजनानंतर प्रत्येक वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गात हा कार्यक्रम साजरा केला. या वेळी त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याची माहिती सांगितली.

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांच्या आदेशाने नवी मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाहीर अभिवादन करून आदरांजली अर्पण करण्यात आली.



भाजपच्या दारावे येथील पक्ष कार्यालयात माजी नगरसेवक सुनील पाटील यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या वेळी उपासक दादाराव सुरवाडे, भीमराव लोणारे, नथुराम बनसोडे, बबन कदम, मंगल वाघ, सुरेश परब, विक्रांत गवारे यासह बौद्धजन समितीचे उपासक उपस्थित होते. भाजप आयकर कॉलनी आणि धम्मदीप सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुभाष गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समाज मंदिर हॉल येथे बौद्धाचार्य सूर्यकांत बोधी यांच्या उपस्थितीत महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. पंचशील पालनाचा अभाव जाणवत असल्याने प्रत्येक उपासक–उपासकाने बौद्ध धम्म दीक्षा घेऊन एक आदर्श बौद्ध समाज घडवला पाहिजे, असे विचार आपल्या प्रवचनातून सूर्यकांत बोधी यांनी मांडले. या वेळी उपासक पंजाबराव हरले, एम. डी. कांबळे, भीमसेन तपासे यासह आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

नेरूळ सेक्टर ११ मधील भाजप कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, विकास सोरटे सह भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला भाजपच्या वतीने सुभाष गायकवाड यांच्या उपस्थितीत भव्य कँडल मार्च काढून आदरांजली अर्पण करण्यात आली.

## अफवांवर विश्वास ठेवू नये –कादबाने

### कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाचे वेगवेगळे नियम जाहीर करण्यात येत आहेत. हे सर्वांना बंधनकारक असून त्याचे पालन सर्वांनी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सोशल मीडियाद्वारे पसरविण्यात येणाऱ्या अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये. अशा प्रकारच्या अफवा पसरविल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांनी दिला. ते सोमवारी (दि. ६) घेतलेल्या शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीच्या बैठकीत बोलत होते.



या बैठकीला पोलीस उपनिरीक्षक महाडिक, गोपनिय विभागाचे शैलेश जाधव यांच्यासह शांतता कमिटी व मोहल्ला कमिटीचे नगरसेवक मुकीद काझी, जुबेर पटेल, नाविद पटेल, अशफाक काझी, मुदसिर पटेल, जावेद पटेल, साजिद पटेल, रशिद शेख, रफिक शेख, मन्सुर पटेल, इम्रान पटेल आदी सदस्य उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना विजय कादबाने यांनी सांगितले की, सर्वांनी एकोप्याने राहणे गरजेचे असून पनवेल शहर हे सर्वांना सामावून घेणारे शहर आहे. त्याला एक इतिहास आहे. त्यामुळे सर्व जाती धर्माचे लोक एकोप्याने सण, कार्यक्रम साजरे करतात. सध्या कोरोनाची लाट परत येण्यास सुरुवात झाली आहे. या वेळी याच्याविरुद्ध लढा देण्यासाठी सुद्धा सर्वांनी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जशी मदत लागेल त्याप्रकारची मदत इतरांना करायची आहे. कोणीही अफवा पसरवू नये, या संदर्भात त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले आहे.

### डॉ. स्मिता पाटील यांना पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र अंतर्गत स्थापित महिला उत्कर्ष समितीच्या राज्य अध्यक्ष डॉ. स्मिता अजय पाटील यांना महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मेडीक्विन एक्सिलेंस अवॉर्ड राजभवन येथे झालेल्या सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या अगोदरही डॉ. स्मिता पाटील यांना डॉक्टर व्यवसाय सांभाळून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. डॉ. स्मिता पाटील यांना राज्यपालांच्या हस्ते सन्मानित केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गजानन दर्णे यांच्या ‘दोन एकर जमीन’चे प्रकाशन

**चिरनेर : प्रतिनिधी**

उरण येथील ज्येष्ठ बालवाङ्मयकार व वयोवृद्ध साहित्यिक गजानन दर्णे यांच्या ‘दोन एकर जमीन’ या सोळाव्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले.

विनायक–केगाव येथे झालेल्या या कार्यक्रमास नाटककार व आगरी साहित्य विकास मंडळाचे अध्यक्ष मोहन भोईर, ज्येष्ठ पत्रकार धनंजय गोंधळी, ग्रँडवेल कंपनीचे सिनियर मॅनेजर आय. बी. सिंग, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार आदी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. तर अध्यक्षस्थान निवृत्त शिक्षक लक्ष्मण द. वीर यांनी भूषविले. ज्येष्ठ कवी राजेंद्र नाईक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. दर्णे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या पुस्तक प्रकाशनाचे मुख्य प्रयोजन हे कोविड बाधितांना सढळ हाताने आर्थिक मदत करणे हे आहे. या कथासंग्रहाच्या विक्रीतून जो निधी जमा होईल त्यातील काही रक्कम ही त्यांच्या मदतीसाठी दिली जाईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमिला पवार यांनी केले. सदर कार्यक्रमास काशिनाथ मढवी, हरिश्चंद्र माळी, पुंडलिक म्हात्रे यांच्यासह दर्णे यांचे नातेवाईक व केगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवी मुंबईमध्ये होणार सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या सुपर स्पेशालिस्ट रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याच्या मागणीनुसार नवी मुंबईत शासकीय रुग्णालय व मेडिकल पदवी महाविद्यालय उभारण्यासाठी सिडकोने सीबीडी येथे भूखंड देण्याची तयारी दर्शविली असून सिडकोकडून नवी मुंबई मनपास भूखंड हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



> **नागरिकांना मोफत उपचार मिळावे, तसेच नवी मुंबईत एकही मेडिकल पदवी कॉलेज नसल्याने सामान्य घरातील स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण मिळावे याकरिता माझ्या बेलापूर विधानसभा क्षेत्रात भव्य, सुसज्ज, सर्व सुविधांयुक्त, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल पदवी कॉलेज उभारावे, अशी मागणी मी केली होती. ती लवकरच साकार होणार असल्याचा आनंद आहे.**
> **–आ. मंदाताई म्हात्रे, बेलापूर विधानसभा**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईत एक भव्य सुसज्ज असे शासकीय रुग्णालय आणि मेडिकल पदवी महाविद्यालय उभारणीची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानंतर राज्यात स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारच्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे रुग्णालय व महाविद्यालय उभारण्याची मागणी केली. त्याला सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी भूखंड हस्तांतरणाबाबत दाखविलेली तयारी यामुळे या सगळ्यांची मी आभारी आहे, असे आ. मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. रुग्णालय उभारणीसाठी आमदार निधी आणि मोठ्या उद्योगाकडून सीएसआर फंड उभारण्याची तयारी देखील करणार असल्याचे आ. म्हात्रे या वेळी म्हणाल्या. दरम्यान, सिडकोने रुग्णालय आणि महाविद्यालयासाठी देऊ केलेल्या भूखंड हस्तांतरण करण्याबाबतचा निर्णय प्रशासकीय पातळीवर सुरू आहे, असे पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी बोलताना सांगितले.

## संपादकीय

# ओमायक्रॉनचा बागुलबुवा

**ओमायक्रॉन विषयीची जागतिक भीतीची लाट काहीशी अनाठायीच असल्याचे आता निष्पन्न झाले आहे. ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग झपाट्याने होतो हे खरे असले, तरी त्याची घातकता नगण्य असल्याचे शास्त्रज्ञांच्या निदर्शनास आले आहे. साध्यासोप्या भाषेत सांगायचे झाले तर गेला महिनाभर ओमायक्रॉनचा गवगवा जगभर होत आहे, परंतु त्यामुळे कुठल्याही देशात एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही. अर्थात असे असले तरी काळजी घेण्याची गरज आहेच. कारण याच विषाणूचे पुढील उत्परिवर्तन प्राणघातक ठरू शकते.**

**कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन या नव्या विषाणूप्रकाराच्या दहशतीने अवघे जग हादरून जाणे साहजिकच होते. या विषाणूचे वर्तन आणि प्रसार नेमका कसा होतो याबद्दल विज्ञान जगतात देखील बरीचशी अनभिज्ञता असल्यामुळे जगभर घबराट उडाली. ज्या दक्षिण आफ्रिकेमध्ये ओमायक्रॉनचा प्रादूर्भाव सर्वप्रथम आढळला, तेथे कडक निर्बंध लादण्यात आले. ओमायक्रॉनचा संसर्ग डेल्टा विषाणूपेक्षा ३० पट अधिक वेगाने पसरतो हे कळल्यानंतर बहुतेक देशांनी दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना, इस्वातिनी या लगतच्या देशांतील प्रवाशांना इतरत्र प्रवास करण्यास मज्जाव केला. भारताने देखील ओमायक्रॉनच्या भीतीने आपली नियमावली बदलली, परंतु ओमायक्रॉन हा कोरोना विषाणूचा व्हेरिएंट किंवा प्रकार सुपरमाइल्ड अर्थात अतिशय सौम्य असल्याचे मत जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केल्यानंतर बऱ्याच देशांनी आता दक्षिण आफ्रिकन प्रवाशांवरील निर्बंध उठवण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. दक्षिण आफ्रिका हा देश बव्हंशी पर्यटन आणि खाणकाम या दोन उद्योगांवर अवलंबून असतो. ओमायक्रॉनच्या प्रसारामुळे या देशाची आधीच डबघाईला आलेली अर्थव्यवस्था पुरती जमीनदोस्त होण्याचा धोका होता. याचाच विचार करून अमेरिकी राष्ट्राध्यक्षांचे वैद्यकीय सल्लागार डॉ. अँथनी फाऊची यांनी ओमायक्रॉनची भीती न बाळगण्याचे आवाहन केले आहे. केंद्र सरकारने देखील भारतीय नागरिकांना घाबरून जाण्याचे कारण नसल्याचा निर्वाळा दिला आहे. महाराष्ट्रात मात्र निर्बंधांचे चित्र संभ्रमाचेच दिसते. कधी काय बंद होईल हे सांगता येत नसल्यामुळे मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील नागरिक हवालदिल झाल्याचे चित्र आहे. कोरोनाचे निमित्त पुढे करून महाविकास आघाडी सरकारकडून विकासकामे बंद करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. आपल्याला जे जमले नाही त्याचे खापर केंद्र सरकारवर फोडायचे आणि कोरोनाची भीती दाखवून उरलेली कामे देखील बंद ठेवायची हा मविआ सरकारचा खाक्या राहिला आहे. सरकारच्या या दुर्लौकिकामुळेच महाराष्ट्रातील व्यापारीवर्ग आत्मविश्वास गमावून बसल्यासारखा झाला आहे. बंगाल आणि गुजरातचे मुख्यमंत्री सत्ताधारी आघाडीच्या नाकावर टिच्चून मुंबईत येतात आणि येथील उद्योजकांना आपापल्या राज्यात येण्याचे निमंत्रण देतात. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देखील चांगला मिळतो. हे पाहून महाविकास आघाडी सरकारला खरे तर आत्मचिंतन करण्याची गरज आहे, परंतु तसे काही होण्याची शक्यता दिसत नाही. कारण या आघाडीला रस आहे तो खुर्ची टिकवण्याच्या राजकारणात. महाराष्ट्राच्या जनतेची त्यांना काहीही पडलेली नाही. ओमायक्रॉन विषाणूचा धोका ओळखून सावधगिरीने पावले उचलणे वेगळे आणि ओमायक्रॉनचे निमित्त पुढे करून जनतेची कामे बंद करणे वेगळे. दुसऱ्या प्रकारच्या निरुद्योगीपणात महाविकास आघाडी सरकार एव्हाना तज्ज्ञ झाले आहे. दोन वर्षे न केलेल्या कामांबद्दल स्वत:ची पाठ थोपटून घेणाऱ्या पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या की काम भागते, असे आघाडीच्या नेत्यांना वाटत असेल तर ते भ्रमात आहेत.**

# पनवेल परिसरात बेरोजगारांना लुटणाऱ्या टोळ्या कार्यरत

कोरोनामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, रोजगार नसल्याने काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्याचा फायदा घेऊन त्यांना लुटणाऱ्या टोळ्या आपल्याकडे कार्यरत झाल्या आहेत. घरबसल्या पार्टटाईम काम, पेपर रायटिंग, कॉपी पेस्टिंग आणि डेटा एंट्रीचे काम करून महिना हजारो रुपये कमवा, अशा जाहिराती केल्या जात आहेत. अशा जाहिरातींच्या जाळ्यात अडकवून अनेक बेरोजगारांना लुबाडणाऱ्या टोळीवर नवी मुंबई पोलिसांनी कारवाई केली, त्यांचे कौतुकही झाले. पण त्यांच्याच हद्दीतील पनवेल रेल्वे स्टेशनच्या नवीन पनवेल बाजूला एक महिन्यापासून एक टोळी भरदिवसा लाल-पिवळा जुगार खेळायला भाग पाडून नागरिकांना राजरोसपणे लुटत आहे, दहशत निर्माण करीत आहे. मात्र आयुक्त साहेब, पोलीस काहीच करीत नाहीत. यामागचे गौडबंगाल काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.



**खबरबात**
**नितीन देशमुख**

आज नोकरी मिळवणे ही मोठी समस्या झाली आहे. अनेक इंजिनियर, पदवीधर तरुण-तरुणी नोकरीसाठी धडपडत आहेत. पालकही आपल्या मुलांना नोकरी लागावी यासाठी पैसे द्यायला तयार असल्याचे आपण पाहत असतो. लाखो रुपये देऊनही नोकरी न मिळाल्याने फसवणुकीचे गुन्हे रोजच पोलीस ठाण्यात दाखल होत असल्याच्या बातम्या आपण वाचत असतो. तरीही रोज पुन्हा नवीन माणसे फसताना दिसतात. घर बसल्या पार्टटाईम काम, पेपर रायटिंग, कॉपी पेस्टिंग आणि डेटा एंट्रीचे काम करून महिना हजारो रुपये कमवा अशा जाहिराती वाचून त्या ठिकाणी गेल्यास एअरकंडिशन ऑफिसमध्ये बसलेली रिसेप्शनिस्ट तरुणी तुमचे स्वागत करते. तुम्हाला केबिनमध्ये बोलावले जाते. आतमध्ये बसलेली व्यक्ती तुमची विचारपूस करते. कोठून आलात, काय करता तुमची थोडीशी कौटुंबिक माहिती विचारली जाते आणि रजिस्ट्रेशन फी म्हणून एक हजारापासून १५०० रुपयापर्यंत भरायला सांगितले जाते. त्यानंतर ५-६जणांच्या ग्रुपला एकत्र बसवून तेथील तरुणी तुम्हाला कामाची माहिती देते.

ती तरुणी तुम्हाला एक मराठी पुस्तक दाखवते याची कॉपी पेनने कागदावर करून आणायची आहे. तुम्हाला कोरे पेपर आणि पेन आम्ही देऊ, त्यावर रेषा मारून तुम्ही लिहायचे आहे. तुम्हाला एका पानाचे २०-३० रुपये मिळतील. त्यामध्ये चुका झाल्यास पैसे कापले जातील १० पेक्षा जास्त चुका झाल्यास त्या पानाचे पैसे मिळणार नाहीत, असे सांगितले जाते. काम दिसायला सोपे असते. कोणालाही वाटते आपण दिवसात सहज १५-२० पाने लिहू शकू, म्हणजे दिवसाला ५००-६०० रुपये घरबसल्या सहज मिळवू शकतो. तुम्ही लगेच काम करायला तयार होता. तुम्हाला भरलेल्या पैशाच्या मोबदल्यात एक दोन रुपयाचा पेन, दोन डझन कोरे कागद आणि एका पुस्तकाची काही पाने दिली जातात. हे काम १५ दिवसात पूर्ण करा, मग पुढील काम मिळेल. दिलेले काम तपासल्यावर त्याचे पैसे आठवड्याने तुम्हाला मिळतील, असे सांगितले जाते. काम घेऊन खुशीत तुम्ही घरी येता. मग कामाला सुरुवात केल्यावर कळते की बारीक टाईपमध्ये असलेल्या पुस्तकाची कॉपी करणे सोपे नाही. दोन तासात एक पान पूर्ण होते. त्यामध्ये अनेक चुका झालेल्या असतात. म्हणजे दोन तास काम करून दोन रुपयेही मिळू शकत नाहीत, हे लक्षात येते. मग आपले डोळे उघडतात की, आपण दोन रुपयाचे पेन आणि दोन डझन कागदासाठी हजार किवा जास्त रुपये देऊन पुस्तकाची पाने म्हणजे रद्दी घेऊन आलो आहोत. पण या ऑफिस टाकून बसलेल्याला रोज १० माणसे तरी मिळाली असे धरले तर दहा हजार कोठेच गेले नाहीत. महिना दोन लाख ६० हजार. त्यापैकी पगार, भाडे आणि इतर खर्च ६० हजार गेले तरी दोन लाख रुपये मिळतात. अशा रीतीने बेकारांना फसवण्याचा हा धंदा जोरात आहे.

आता यामध्ये तुम्हाला काम देताना तुमच्या एका करारावर सह्या घेतल्या जातात. तुम्ही काम करायला नकार दिलात की वकिलाचे फोन येतात, काम करा नाहीतर नुकसानभरपाई द्या. अन्यथा पोलीस कारवाई केली जाईल. पोलीस कारवाईच्या भीतीने त्यांना पैसे दिले की त्यांची मागणी वाढत जाते आणि या चक्रात माणूस अडकत जातो. करारावर सही केली आहे, कोर्ट-कचेरी नको म्हणून कोणी पोलिसात तक्रारही करीत नाही. याचा फायदा घेऊन लुटण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यातील एका टोळीला नवी मुंबई पोलिसांनी पकडले. त्याबद्दल त्यांचे कौतुकही करण्यात आले. अशाच वेगवेगळ्या प्रकारे बेरोजगार तरुणांना लुटणाऱ्या अनेक टोळ्या सध्या सक्रीय झाल्या आहेत. त्यांच्यावरही पोलिसांनी कारवाई करणे अपेक्षित आहे.

पनवेल रेल्वे स्टेशनच्या नवीन पनवेल बाजूच्या फुटपाथवर एक १०-१५ जणांची टोळी एक महिन्यापासून सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत काळा-पिवळा जुगार मांडून बसते. या वेळेत महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरीसाठी वणवण फिरणाऱ्या बेरोजगारांची वर्दळ असते. टोळीचे सदस्य या ठिकाणी त्यांना आपले सावज बनवीत आहेत. अनेक जण पैसे नसल्याने त्यांच्या हाता-पाया पडून गयावया करताना दिसतात. पण टोळीचे सदस्य त्यांना दम देऊन एटीएममध्ये घेऊन जातात व पैसे काढून द्यायला लावत असल्याचे दृश्य पाहायला मिळते. फुटपाथ यांनीच अडकवल्याने पादचाऱ्यांना त्यावरून चालण्यासाठी जागाच राहिलेली नाही. त्यामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागते. या ठिकाणी रिक्षा स्टँडवर मोठी रांग लागलेली असते अनेक रिक्षा व दुचाकी जोरात येत असल्याने अपघातही होत आहेत.

या जुगारी टोळीतील सदस्य रस्त्यावर वेगेगळ्या ठिकाणी उभे राहून लक्ष ठेवत असतात. निलकमल हॉटेलपासून ते अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक कट्ट्यापर्यंत उभे राहून टोळीतील सदस्य दहशत निर्माण करीत आहेत. त्यांना कोणी फोटो काढत असल्याचा संशय आल्यास किंवा एखाद्याला लुटले की लगेच ते सगळे पळून अभ्युदय बँकेच्या बाजूला जातात. पुन्हा काही वेळाने परत या ठिकाणी येतात. याबाबत खांदेश्वर पोलिसांकडे तक्रारी होऊनही कोणतीही कारवाई होत नसल्याने या जुगारी टोळीची हिंमत वाढलेली दिसते. काही दिवसांनी दिवसाढवळ्या त्यांनी महिलांना लुटायला सुरुवात केली तर नवल वाटू नये अशी परिस्थिती आता निर्माण होऊ लागली आहे. अनेक तक्रारी येऊन या वेळात एकदाही पोलीस त्या ठिकाणी राऊंडला का येत नाहीत. फोन केल्यावर आता पोलीस पाठवू का, असे विचारले जाते. पोलीस निघल्याची माहिती जुगारी टोळीतील सदस्यांना आधीच कशी मिळते, असे साधे प्रश्न पोलीस आयुक्त साहेब, सामान्य माणसांना पडले आहेत.

# पेण येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांची आकलन शक्ती, शिस्त फार गरजेची आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धांत सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी पेण येथे केले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग आणि विशेषत: राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर बोलत होते. या केंद्राला चांगला प्रतिसाद मिळाल्यास अन्य तालुक्यांमध्येदेखील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा मानस डॉ. कल्याणकर यांनी या वेळी व्यक्त केला.

पेण प्रांतधिकारी विठ्ठल इनामदार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, संस्थेचे अध्यक्ष मंगेश नेने, महाविद्यालयाचे प्राचार्य सदानंद धारप आदी या वेळी उपस्थित होते.




(छाया : अनिस मनियार)

# रोह्यात सामाजिक कार्यकर्त्यांची कार्यशाळा



**धाटाव : प्रतिनिधी**

नेहरु युवा केंद्र-अलिबाग आणि सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान-रोहा यांच्या संयक्त वतीने रोह्यात सामाजिक कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. भारतीय उत्पादनाला प्राधान्य देत युवकांनी समाजात चांगले कार्य करण्याचे आवाहन यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुशील सायकर यांनी केले.

या कार्यशाळेत सुशील सायकर व नेहरू युवा केंद्राचे निशांत रौतेला यांनी युवा सामाजिक कार्यकर्ता कसा असावा आणि कॅच द रेन या विषयांवर मार्गदर्शन केले.स्वच्छता व जलजीवन मिशनसाठी कोणते उपक्रम हातात घेता येतील, त्यासाठी काय उपाययोजना करता येतील याविषयी निशांत रौतेला यांनी माहिती दिली.

रोह्यातील राजमुद्रा फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग, अध्यक्ष राजेश डाके, श्रद्धा घाग, कार्याध्यक्ष राजेश भगत, रोट्रॅक्ट क्लबचे प्रेसिडेंट आकाश रुमडे, स्वामीराज फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश माने याच्यासह रोह्यातील युवा सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सुराज्य संस्थेचे अध्यक्ष रोशन चाफेकर यांनी आभार मानले.

# डॉ. आंबेडकरांच्या कार्याची आठवण होणे गरजेचे -सरपंच डॉ. चेतन जावसेन

**मुरूड : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची आठवण आजच्या पिढीला होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन बोर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. चेतन जावसेन यांनी सोमवारी (दि. ६) केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बोर्ली ग्रामपंचायत कार्यलायात सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यावेळी सरपंच डॉ. चेतन जावसेन बोलत होते. संविधानाचे रक्षण करणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी या वेळी सांगितले. रायगड जि.प.चे माजी सदस्य वामन चुनेकर, बोर्लीचे उपसरपंच मतीन सौदागर, भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे कोकण विभागीय अध्यक्ष अमूलकुमार जैन, सागर माळजी, नूतन नरहरी यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

# अलिबागच्या केळकर विद्यालयाचे सुयश

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये घवघवित यश मिळवले. शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील २० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. विधी सेवा प्राधिकरण रायगड यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये केळकर विद्यालायच्या विद्यार्थ्यांनी २७ पैकी १४ बक्षीसे पटकावली.

पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात केळकर विद्यालयातील मराठी माध्यमाच्या पाचवीचा एक तर आठवीचे तीन विद्यार्थ्यी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. इंग्रजी माध्यमातील पाचवीचे सात तर आठवीचे नऊ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील एकूण २० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले.

विधी सेवा प्राधिकरण रायगड यांच्यातर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्ताने पॅन इंडिया अवेरनेस कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध व घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण २७ बक्षीसे जाहीर करण्यात आली. त्यापैकी १४ बक्षीसे चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवली.

चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश विभा प्र. इंगळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. जिल्हा विधी प्राधिकरणचे सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश संदीप स्वामी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# फणसाड अभयारण्यातील रानभेंड पहाण्यासाठी पर्यटकांची पसंती

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यात तब्बल ११.७७ मीटर वेढीचे महाकाय झाड आहे. ज्याला 'रानभेंड' असे संबोधतात. ही उंचच उंच रानभेंड पर्यटकांची आकर्षण ठरली आहे.

जेंव्हा महाकाय वृक्षांचा विषय चर्चेस येतो तेव्हा आलापल्ली, एटापल्ली, गडचिरोली, चंद्रपूर, भामरागड अशी नावे वृक्षप्रेमी, निसर्गप्रेमी यांच्याकडून कानावर पडतात. आलापल्ली येथील साग वृक्षाची जोडी राम-लक्ष्मण नावाने प्रसिद्ध आहे. या झाडाची वेढी ५.४५ मीटर आहे. परंतु त्या पलिकडे जाऊन एक अचंबित करणारे रानभेंड हे झाड मुरूड तालुक्यांतील फणसाड अभयारण्यात आहे. त्याची वेढी तब्बल ११.७७ मीटर आहे. वनस्पती शास्त्रात या झाडाला ढशीीराशश्रशी पींवळषश्रीर असे म्हटले जाते. रानभेंडीचे हे महाकाय झाड पर्यटकांसाठी सेल्फी पॉईट ठरले आहे. या उंच रानभेंड वृक्षाला पर्यटकांची सार्वाधिक पसंती मिळत आहे.



**फणसाड अभयारण्यात रानभेंड हा विशाल वृक्ष असून, त्यावर पक्षांची घरटीसुद्धा आहेत. या उंच झाडाबद्दल पर्यटकांना आकर्षण असून, या वृक्षाखाली सेल्फी घेण्याचा मोह सर्वांनाच होत आहे.**
**-राजवर्धन भोसले, वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड अभयारण्य, ता. मुरूड**

# कर्जत गुडवणवाडीत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्टच्या सहकार्याने आणि डॉ. निर्मला राव यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील बोरिवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील गुडवणवाडीमधील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे तसेच आदिवासी बांधवांना सोलापुरी चादरींचे वाटप करण्यात आले.

दुर्गम भागात वसलेल्या गुडवणवाडीमधील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी डॉ. निर्मला राव यांनी पाच हजार रुपयांची मदत करण्यात आली. यावेळी शिक्षक दिलीप घुले, नागेश खडे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# अनधिकृत बांधकामाविरोधात तांबडी ग्रामस्थ आक्रमक

## खोपोली नगरपलिकेला दिला आत्मदहनाचा इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील तांबडी या वसाहतीमध्ये नदाफ नावाच्या रहिवाशाने अनधिकृत घराचे बांधकाम सुरू केले आहे. सदरची जागा वहिवाटीची असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी या जागेवरील अनधिकृत बांधकामाला तीव्र विरोध दर्शवित आत्मदहनाचा इशारा दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

खोपोली नगरपालिका हद्दीतील वासरे गावामधील तांबडी वसाहतीमध्ये नदाप नावाच्या रहिवाशाने नगरपालिकेच्या परवानगीशिवाय घराचे बांधकाम सुरू केले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार सदरची जागा वहिवाटीची आहे व या जागेतून सांडपाणी वाहिनी जाते. त्यामुळे त्यांनी या अनधिकृत बांधकामाला विरोध दर्शविला आहे. या बाबत स्थानिकांनी खोपोली नगरपालिका प्रशासनाला निवेदनही दिले होते. त्याची दखल घेत नगरपालिकेच्या नगररचना विभागाने नदाफ याला १८ नोव्हेंबर रोजी कारवाई करण्याचे पत्र दिले होते. मात्र त्याने या पत्राला केराची टोपली दाखवत बांधकाम सुरू ठेवले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या स्थानिकांनी पुन्हा नगरपालिका प्रशासनाला पत्र दिले. तर तांबडी वसाहतीमधील रहिवासी अशोक मरियप्पा त्रिकेनुर यांनी तर येत्या आठ दिवसात योग्यती कारवाई झाली नाही तर, नगरपालिका कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचे निवेदन सोमवारी (दि. ६) नगरपालिका प्रशासनाला दिले.

**बेकायदेशीर बांधकामास आक्षेप घेतल्यानंतर नदाफ याने आम्हाला शिवीगाळ केली, त्याबाबत आम्ही पोलीस ठाण्यातही तक्रार दिली आहे, तसेच मी आत्मदहन करणार असल्याचेही पोलीस ठाण्यात सांगितले आहे.**

**–अशोक मरियप्पा, ग्रामस्थ, तांबडी वसाहत, खोपोली**



(छाया : विनायक माडपे)

# कर्जत उपजिल्हा रुग्णालय परिसरातील
# तीन इमारती धोकादायक

**कर्जत : बातमीदार**

येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरातील तीन इमारतींना शासनाने धोकादायक ठरवले आहे. त्या इमारती रिकाम्याही करण्यात आल्या आहेत. या धोकादायक इमारती जमीनदोस्त कराव्यात, असे आदेश असूनदेखील संबंधीत विभाग कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही. दरम्यान, त्या धोकादायक इमारती जमीनदोस्त कराव्यात आणि संभाव्य धोका टाळावा अशी मागणी सम्यक विद्यार्थी संघटनेने केली आहे.

कर्जत उपजिल्हा रुग्णालय होण्याआधी कर्जत येथे आरोग्य केंद्र होते. त्यावेळी जुन्या इमारतीमधून कारभार चालत होता. उपजिल्हा रुग्णालयाची नवीन इमारत बांधण्यात आल्यानंतर जुन्या आरोग्य केंद्राच्या इमारतीचा वापर गेल्या काही वर्षात पूर्णपणे बंद झाला होता. त्यामुळे ती इमारत धोकादायक बनली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वर्षांपूर्वी ही इमारत धोकादायक म्हणून जाहीर केली आहे.

या उपजिल्हा रुग्णालय आवारातील आणखी दोन इमारती कर्जत नगर परिषदने धोकादायक म्हणून जाहीर केल्या आहेत. त्यामुळे या दोन इमारतीमध्ये राहणारे कर्मचारी अन्यत्र भाड्याने राहत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या दोन्ही इमारती जमीनदोस्त करून तेथे नव्याने मोठी इमारत बांधावी, जेणेकरून उपजिल्हा रुग्णालयातील सर्व कर्मचारी हे रुग्णालय परिसरात राहू शकतील. मात्र गेली चार वर्षे सार्वजनिक बांधकाम विभाग रुग्णालयाची जुन्या इमारती जमीनदोस्त करीत नाही. त्यामुळे या धोकादायक इमारती कोसळून अपघात होण्याची भीती सम्यक विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड. कैलाश मोरे यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने कामगारांच्या निवासी इमारती आणि रुग्णालयाची जुनी इमारत यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांनी केली होती.

**कर्जत उपजिल्हा रुग्णालय कामगारांच्या निवासी इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, असे पत्र शासनाच्या व्हीजेटीआय या संस्थेला दोन वर्षांपूर्वी दिले आहे. त्यांनी ऑडिट केल्यानंतर या इमारती पाडायच्या की दुरुस्त करायच्या? यावर निर्णय घेण्यात येईल.**

**–अक्षय चौधरी, प्रभारी शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत**



(छाया : संतोष पेरणे)

## मुरूडमधील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी
# १४ उमेदवारी अर्ज दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील आठ ग्रामपंचायतीमधील सदस्य पदांच्या २१ रिक्त जागांसाठी १३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान, राजपुरी, सावली, चोरढे या ग्रामपंचायतीमधील पोटनिवडणुकीसाठी एकही उमेदवारी अर्ज न दाखल झाल्याने त्या ठिकाणी निवडणूक होणार नाही.

मुरूड तालुक्यातील वावडुंगी, सावली, एकदरा, राजपुरी, मजगाव, उसरोली, चोरढे, कोर्लई या आठ ग्रामपंचायतीमधील सदस्य पदांच्या २१ जागा रिक्त असून, त्यासाठी पोटनिवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार उमेदवारी अर्ज भरण्याच्या आज शेवटच्या दिवसापर्यंत १४ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

वावंडुगी ग्रामपंचायतीच्या प्रभाग १ मधून गोविंद भिकू अदावडे यांनी तर कोर्लई ग्रामपंचायतीच्या प्रभाग २ मधून जना कृष्णा वाघमारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



(छाया : संजय करडे)

मजगांव ग्रामपंचायतीच्या प्रभाग १ मधून वर्षा योगेंद्र गोयजी, अभिनव शांताराम कोळी, जनाबाई रमेश वाघमारे, प्रभाग २मधून वर्षा योगेंद्र गोयजी, जनाबाई रमेश वाघमारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

राजश्री मनिष नांदगावकर, सुनिता संतोष मांदाडकर, समृद्धी प्रशांत पाटील, अश्वनी नितेश पाटील यांनी उसरोली ग्रामपंचायतीच्या प्रभाग ५मधून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

एकदरा ग्रामपंचायतीमधील प्रभाग ३ सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. तेथे दर्शना मधुकर मकु आणि मंगल वामन झुझे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत गुरुवारी (दि. ९) दुपारी ३वाजेपर्यंत आहे, त्यानंतर निवडणूकीचे चित्र स्पष्ट होईल.

## दस्तुरी नाक्यावर घोडेवाल्याची दादागिरी

**कर्जत : बातमीदार**

माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथील वाहनतळात अवैद्यरीत्या घोड्यांवर पर्यटक बसविण्यावरून घोडे चालकांची कर संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांसोबत शाब्दिक चकमक झाली. यावेळी घोडेवाल्याने दादागिरी करून शिवीगाळ केल्याची तक्रार दाखल होताच माथेरान पोलिसांनी संबंधित घोडेचालकावर अदखल पात्र गुन्हा दाखल केला आहे.

माथेरान नगर परिषदेच्या कर संकलनाचा ठेका घेतलेले दत्ता सुतार हे वाहनतळात पर्यायी मार्ग असलेल्या नो पार्किंग गेटजवळ काम करीत होते. त्यावेळी तेथील घोडेवाल्याने वाहतळात चक्क चार घोडे नेले. त्याला दत्ता सुतार यांनी हरकत घेतली. दिव्यांग व्यक्तीचा घोडा सोडून इतर पर्यटकांना घोड्यावरुन खाली उतरव आणि त्यांची थर्मल स्क्रीनिग व ऑक्सिजन लेव्हल तपासून त्यांना मुख्य रस्त्यावरुन घेऊन जा असे त्यांनी सदर घोडेवाल्याला सांगितले. त्यामुळे घोडेवाल्याचा संताप अनावर झाला. त्याने दत्ता सुतार यांना शिवीगाळ करून तुला कामाला लावतो, तुला बघून घेईन अशी दमदाटी केली. त्यानंतर सुतार यांनी पोलीस ठाणे गाठले व सदर घोडेवाल्याची रितसर तक्रार केली. सहायक फौजदार नारायण बार्शी यांनी या प्रकरणी अदखल पात्र गुन्ह्याची नोंद केली.

## माणगावमध्ये महामानव डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये सोमवारी (दि. ६) महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

सुरुवातीला प्राचार्या डॉ. संध्या कुलकर्णी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. हर्षल जोशी व प्रा. मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल माहीत दिली. प्राचार्या डॉ. कुलकर्णी यांनीही आपले विचार मांडले. प्रा. डॉ. माळी यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)

# सुहित जीवन ट्रस्टला कायम पाठबळ राहील

## जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांची ग्वाही

**पेण : प्रतिनिधी**

बौद्धिक अक्षम मुलांच्या पेण येथील सुहित जीवन ट्रस्टला आपले कायम पाठबळ राहील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी दिली.

जागतिक दिव्यांग सप्ताह निमित्ताने सुहित जीवन ट्रस्टने नुकताच विद्यार्थी व पालक यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्या वेळी जिल्हाधिकारी कल्याणकर बोलत होते. या वेळी त्यांनी ट्रस्टच्या कार्याची, तसेच विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या विविध वस्तूंची प्रशंसा केली.

या वेळी राष्ट्रीय पातळीवर विविध खेळांमध्ये निवड झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुहित जीवन ट्रस्टचे विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे काही मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. चित्रकला, रांगोळी तसेच टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविणे आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

पेणचे प्रांत विठ्ठल इनामदार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, नगर परिषेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, समाजकल्याण अधिकारी गजानन लेंडी, सहाय्यक सल्लागार किशोर वेखंडे, भालचंद्र भगत, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा पाटील, विश्वस्त वरुण पाटील यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते.



(छाया : अनिस मनियार)

## कर्जत गौरकामत येथे चारा प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या आचलोली (ता. महाड) येथील कृषी महाविद्यालयाचे चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी विजय सखाराम उंडे, जयदीप प्रकाश भेलके, निखिल रमेश मोरे, विनय कुमार मराडा यांनी कर्जत तालुक्यातील गौरकामत येथे सुक्या चाऱ्यावरील प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर केले. या वेळी त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना चाराप्रक्रियेबाबत मार्गदर्शनही केले.

या विद्यार्थ्यांनी प्रथम शेतकऱ्यांसमवेत चर्चा करून चाऱ्याच्या उपब्धतेबाबत अडचणी जाणून घेतल्या. नंतर उपस्थित कृषिबांधवांना सुक्या चाऱ्यावर कशी प्रक्रिया करावी याची पद्धत, त्याचे प्रमाण, प्रक्रिया करताना घ्यायची काळजी याबाबत माहिती दिली.

प्रक्रिया पूर्ण झाल्यावर चाऱ्याची वाढणारी पौष्टिकता, सकसपणा, तंतुमय पदार्थांची वाढणारी पचनियता, चारा जनावरांना खाद्य म्हणून दिल्यावर त्यांच्या दूध देण्याच्या क्षमतेत व उत्पादनात होणारी वाढ असे विविध फायदे याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गावातील शेतकरी नित्यानंद देशमुख, सूरज देशमुख, आदित्य देशमुख यांच्यासह ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. व्ही. आर. पवार, विषयतज्ज्ञ प्रा. एस. एस. संकपाळ यांचे या प्रात्यक्षिकांसाठी मार्गदर्शन लाभले.





## पाली–कर्जत एसटी सुरू; प्रवासी सुखावले

**पाली : प्रतिनिधी**

विलीनीकरणाच्या मागणीसाठी महिनाभरापासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरु आहे, मात्र आता काही कर्मचारी कामावर रुजू होत आहेत. सोमवारी (दि.६) पालीतून कर्जत एसटी सेवा सुरू झाली. त्यामुळे प्रवासी आनंदित झाले आहेत. सुधागड तालुक्यातील अनेक चाकरमानी व प्रवाशांनी सोमवारी एसटी बसमधून प्रवास केला.

सुधागड तालुक्यातील हभप पोंगडे महाराज व काही प्रवाशांनी चॉकलेट देऊन या बसच्या चालक व वाहकांचे स्वागत केले. ही एसटी बस सकाळी ११ वाजता पालीतून कर्जतला सुटते व पुन्हा तेथून पालीला येते.



(छाया : धम्मशील सावंत)


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender / RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-19/ 7000021583 | AMC for restoration of collapse tower of various 400KV, 220KV & 100KV lines under jurisdiction of EHV (O&M) Circle Panvel | Rs. 75.00 Lakhs |
| Tend-21/ 7000021524 | Supply of various General Asset material required at various location under EHV (O&M) Circle, Panvel for FY2021-22 ( EMD Rs. 5000) | Rs. 4.93 Lakhs |
| Tend-21/ 7000021510 | Procurement of 36kV Circuit Breakers under EHV O&M circle, Panvel | Rs. 10.56 Lakhs. |

EMD 1% of estimated cost of each tender & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 08.12.2021 to 16.12.2021 up to 11.00 hrs, Opening date :- 16.12.2021.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 022-27459625.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**CHANGE OF NAME**

I the undersigned **Jayshree Mahadev Thakur** (Old name) residing At **Plot No. 10, Road No. 12, Sector 12, New Panvel.**

I Changed my Name after marriage by the **Affidavit No. 22546121 2152041731268600306933** dated **16 November 2021.** So that I remitter issue may here after be called by new Name **Jayshree Kamlakar Patil.**

Sign. by New Name
**Jayshree Kamlakar Patil**

# भारताविरुद्ध द. आफ्रिकेचा संघ जाहीर

## कसोटी संघाची कमान डीन एल्गारकडे

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

भारताविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेसाठी क्रिकेट दक्षिण आफ्रिकाने (सीएसए) २१ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. २६ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२२ या कालावधीत विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाविरुद्ध तीन कसोटी सामन्यांमध्ये खेळेल. बायो बबलमुळे एवढ्या मोठ्या संख्येने खेळाडूंचा बोर्डाकडून संघात समावेश करण्यात आला आहे.

क्रिकेट दक्षिण आफ्रिकाने (सीएसए) भारताविरुद्धच्या आगामी मालिकेसाठी नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे, ज्यामध्ये तीन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळवले जाणार आहेत. नव्या वेळापत्रकानुसार भारत २६ डिसेंबरपासून बॉक्सिंग डे कसोटीने दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. सेंच्युरियनच्या सुपरस्पोर्ट पार्कमध्ये हा सामना होणार आहे. उभय संघांमधील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा कसोटी सामना जोहान्सबर्ग येथे खेळवला जाईल आणि तिसरी आणि केपटाऊन येथील न्यूलँड्स स्टेडियमवर खेळवली जाईल. कसोटी मालिका आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा भाग आहे. टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेत कधीही कसोटी मालिका जिंकलेली नाही.

दक्षिण आफ्रिकेची राष्ट्रीय निवड समिती त्याच कोअर ग्रुपसोबत गेली आहे, जिने या वर्षी जूनमध्ये वेस्ट इंडिजचा यशस्वी दौरा केला होता. कगिसो रबाडा, क्विंटन डी कॉक आणि एनरिक नॉर्किया या मालिकेत पुनरागमन करीत आहेत. सीमर डुआन ऑलिव्हियर हाही संघाचा एक भाग आहे, जो यूकेमध्ये दीर्घकाळ राहिल्यानंतर मायदेशी परतला आहे.



### असा आहे संघ

*डीन एल्गार (कर्णधार), टेंबा बावुमा (उपकर्णधार), क्विंटन डी कॉक (यष्टीरक्षक), कगिसो रबाडा, सारेल एरवी, ब्यूरन हेंड्रिक्स, जॉर्ज लिंडे, केशव महाराज, लुंगी एनगिडी, एडन मार्कराम, वियान मुल्डर, एनरिक नॉर्किया, कीगन पीटरसन, रॅसी व्हॅन डर ड्यूसेन, काइल व्हर्न, मार्को जानसेन, ग्लेंटन स्टुर्मन, प्रिनेलेन सुब्रायन, सिसांडा मॅगाला, रायन रिकेल्टन आणि डुआन ऑलिव्हियर.*

**– कसोटी मालिका**

**पहिला सामना** : २६–३० डिसेंबर, सेंच्युरियन. **दुसरा सामना** : ०३–०७ जानेवारी, जोहान्सबर्ग. **तिसरा सामना** : ११–१५ जानेवारी, केपटाऊन

**– एकदिवसीय मालिका**

**पहिला सामना** : १९ जानेवारी, पार्ल

**दुसरा सामना** : २१ जानेवारी, पार्ल

**तिसरा सामना** : २३ जानेवारी, केपटाऊन

# उरणचा क्रिकेटपटू संस्कार म्हात्रेची कोलकात्यामध्ये चमक

## ट्वेन्टी-२० स्पर्धेत ठरला उत्कृष्ट फलंदाज



**उरण : वार्ताहर**

कोलकाता येथे झालेल्या १९ वर्षाखालील ऑल इंडिया डुअर्स कप ट्वेन्टी–२० स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील डोंगरी गावचा संस्कार म्हात्रे याने दमदार कामगिरी करीत उत्कृष्ट फलंदाजाचा पुरस्कार पटकविला. या स्पर्धेत पाच राज्यांतून १६ संघ सहभागी झाले होते. त्यात फोर्टव्हीव मुंबई संघाचे प्रतिनिधित्व करीत संस्कारने धडाकेबाज फलंदाजी केली.

संस्कारने पहिल्याच सामन्यात पॉल चॅटर्जी कोलकाता संघाविरुद्ध २४ चेंडूंत ६२ धावा चोपल्या आणि गोलंदाजी करताना चार षटकांत १३ धावा देऊन दोन गडी बाद केले. त्यामुळे तो सामनावीर ठरला. त्यानंतर आसाम आणि दिल्ली संघांविरुद्धच्या सामन्यातदेखील १३६च्या स्ट्राईक रेटने ६२ चेंडूंमध्ये ९० धावा केल्या, तर गोलंदाजीत आठ षटकांत ३२ धावांच्या बदल्यात तीन गडी बाद केले. त्याला या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाजाचा पुरस्कार मिळाला. याबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

# आरोग्य प्रहर

## रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी ‘हे’ करा!

कोरोनाच्या नवीन व्हेरियेंटने आपल्या देशात एन्ट्री केली आहे. आतापर्यंत संपूर्ण भारतामध्ये ओमायक्रॉनचे रुग्ण आढळले आहे. यामुळे आता लोकांनी ओमायक्रॉनचे चांगलीच धास्ती घेतली आहे. यापासून दूर राहण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आपण काही खास टिप्स फॉलो केल्या पाहिजेत.

**किमान ५० मिनिटे व्यायाम करा**

निरोगी राहण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आपण किमान ५० मिनिटे व्यायाम केला पाहिजे. यामध्ये आपण योगा, चालणे, पळणे, सायकलिंग, पोहणे आणि झुम्बा असा प्रकारचे व्यायाम करू शकता. व्यायामासाठी असा कुठला विशिष्ट वेळ नसतो, पण सकाळीच्या वेळी व्यायाम करणे आपल्या शरीरासाठी अधिक फायदेशीर असते.

**मास्क सर्वांत महत्त्वाचा**

ओमायक्रॉनपासून दूर राहण्यासाठी जसे रोगप्रतिकारक शक्ती महत्वाची आहे तसेच मास्क आणि गर्दीच्या ठिकाणी न जाणेदेखील आवश्यक आहे. सध्याच्या काळात घराच्या बाहेर पडण्यापूर्वी मास्क तोंडाला लावणे खूप महत्त्वाचे आहे. गर्दीच्या ठिकाणी जसे की, सार्वजनिक कार्यक्रमाठिकाणी जाणे टाळाच.

**आहारामध्ये हिरव्या भाज्यांचा समावेश**

शरीरामध्ये कोणत्याही व्हिटामिनची कमी होऊ नये. याकरीता आपल्या दररोजच्या आहारामध्ये दोन हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करा. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. यामध्ये आपण पालक, ब्रोकोली, मेथी, शेपू यांचा समावेश करू शकता. ब्रोकोलीमध्ये लोह, जीवनसत्व ब आणि क मिळते आणि ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते.

**हंगामी फळांचे अवश्य सेवन करा**

रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी दररोजच्या आहारामध्ये दोन हंगामी फळांचा समावेश करा. यामध्ये आपण स्ट्रॉबेरी, मोसंबी, संत्री, पपई, अननस यांचा समावेश करू शकता. स्ट्रॉबेरीमध्ये व्हिटामिन आणि फायबरचे प्रमाण खूप जास्त असते.

**लिंबू**

आपल्या शरीराला दररोज व्हिटामिन सी ची आवश्यकता असते. व्हिटामिन सी शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते. यामुळे सध्याच्या हंगामात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी लिंबाचा आहारात समावेश करा. आपण दररोज सकाळी कोमट पाण्यामध्ये लिंबू मिक्स करू पिऊ शकता.

(टीप : या सदरातील मजकूर हा प्राथमिक माहितीवर आधारित आहे. या माहितीचा वापर करण्यापूर्वी आवश्यकता वाटल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.)

# थांग-ता स्पर्धेत ‘यूएसकेए’चे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण येथे झालेल्या दहाव्या रायगड जिल्हा थांग–ता स्पर्धेत युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनच्या (यूएसकेए) खांदा कॉलनी शाखेतील १५ खेळाडूंनी विविध पदके जिंकून सुयश संपादित केले. या शाखेला चतुर्थ विजेतेपदाने सन्मानित करण्यात आले.

पेण नगर परिषद इन डोअर हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेत ‘यूएसकेए’च्या खांदा कॉलनी शाखेतील श्रुती शिंदे, साक्षी केवट, श्रेया शिंदे, आदित्य कापडोस्कर, हर्षद मेहेत्रे व स्मित पाटील यांनी सुवर्णपदक; कादंबरी बोराडे, अलोकी पालवे, शर्वरी बनसोडे, शिवम केवट, ओम पिसाळ, अथर्व मसुरकर, विघ्नेश पाठक, पंक्ती पाठक यांनी रौप्यपदक; तर रिया चव्हाणने कांस्यपदक पटकाविले.

यशस्वी सर्व खेळाडू एजुकिड्स इंटरनॅशनल आणि आगरी शिक्षण संस्था खांदा कॉलनी येथे सेन्सेई प्रतिक कारंडे यांच्याकडे कराटे व इतर मार्शल आर्टस्चे प्रशिक्षण घेत आहेत. यूएसकेएचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी विजेत्या खेळाडूंचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बोकडवीरा येथे क्रिकेट निवड चाचणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा १४ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १० व ११ डिसेंबर रोजी उरण तालुक्यातील बोकडवीरा येथे निवड चाचणी घेण्यात येणार आहे. असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी ही माहिती दिली.



उरणमधील बोकडवीरा येथील युसीएससी मैदानात निवड चाचणी घेण्यात येणार आहे. १ सप्टेंबत २००७नंतर जन्मलेले रायगड जिल्ह्यातील खेळाडू या निवड चाचणीसाठी पात्र असतील.

निवड चाचणीसाठी खेळाडूंनी सकाळी ८ वाजता मैदानात उपस्थित राहावे.प्रत्येक खेळाडूने आपले आधार कार्ड व जन्म दाखल्याची स्वसाक्षांकित रंगीत सत्यप्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी किरीट पाटील (८८९८०१५२८५), प्रीतम कैय्या (९३२२२४३५३४), सुहास हिरवे (७२०८१८५६१३), अनिरुद्ध पाटील (९०२१६५६५५५), प्रकाश पावसकर (७९७७०१२७४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय बेंच प्रेस स्पर्धेत नितीन शेजवळने पटकाविले सुवर्णपदक



**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्तरावर झालेल्या बेंच प्रेस स्पर्धेत बॉडी लाईन जिमचे प्रशिक्षक नितीन गोविंदा शेजवळ यांनी ५९ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले असून ४७ किलो वजनी गटात नंदिनी उप्पार ही कांस्यपदकाची मानकरी ठरली. या दोघांनी खालापूर तालुक्याचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचाविले आहे.

दोन्ही स्पर्धकांचे तसेच प्रशिक्षक सिद्धार्थ शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या यशस्वी स्पर्धकांचा माजी नगरसेवक महादू जाधव यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी खोपोलीतील नागरिक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# राहीला सलग तिसऱ्यांदा ‘सुवर्ण’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेतील गतविजेत्या राही सरनोबतने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारावरील वर्चस्व पुन्हा सिद्ध करताना ६४व्या राष्ट्रीय अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदकाची कमाई केली.




नवी दिल्ली येथे झालेल्या या स्पर्धेतील महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात महाराष्ट्राच्या राहीने ३७ गुणांसह अग्रस्थान पटकाविले. तिने आपले जेतेपद राखताना दमदार कामगिरी करीत असलेल्या खेळाडूंना मागे टाकले. दिल्लीच्या १४ वर्षीय नाम्या कपूरने ३१ गुणांसह रौप्यपदक मिळवले. तिने नुकतेच कनिष्ठ जागतिक स्पर्धेत ‘सुवर्ण’ कामगिरी केली होती. १० मीटर एअर पिस्तूल प्रकारातील राष्ट्रीय विजेत्या मनू भाकरला २७ गुणांसह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी पनवेलमधील खेळाडू ठरले पात्र

**पनवेल : वार्ताहर**

मुंबईतील कांदिवली ठाकूर कॉलेज येथे नुकत्याच झालेल्या मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन निवड चाचणीमध्ये पनवेलच्या बॉक्सर्सनी विजय मिळविला. यासोबतच त्यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.



सुधागड एज्युकेशन ट्रस्टची विद्यार्थिनी गायत्री पाटील हिने ४५ ते ४८ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला, पनवेल पिल्लई महाविद्यालयातील तेजस धुलुगडे आणि हर्ष उरणकर यांनी ८६ आणि ८० किलो वजनी गटात त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून विजय मिळवला.

सर्व बॉक्सर आंतरराष्ट्रीय बॉक्सर आणि माजी ऑलिम्पियन मनोज पिंगळे यांचे विद्यार्थी आहेत, ज्यांचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर आणि इम्रान खान यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल जिमखाना येथे प्रशिक्षण केंद्र आहे.


*नियमित वाचा...* राम प्रहर



महाड : देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद सोमवारी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी आले होते. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी हेही उपस्थित होते. या आमदारद्वयीने किल्ल्यावरील जगदिश्वराच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले.



पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचे सुपुत्र आणि व्हीडीआयपीएलचे प्रोप्रा. वैभव देशमुख यांना वाढदिवसानिमित्त मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com